**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २० ते २३/२०१५-१६/१६४ दिनांकः २/१२/२०१५

**आदेश**

**आदेश केस क्र. २०,२१,२२,२३ /२०१५-२०१६**

| अर्जदाराचे नांव | | केस क्रमांक | |
|---|---|---|---|
| १) | श्री. महादेव चनगोंडा पाटील<br>मु.पो.सनमडी, ता. जत,जि.सांगली | २० | अर्जदार. |
| २) | श्री. बाळू दरेप्पा गडदे,<br>मु.पो. बाज ता. जत, जि. सांगली. | २१ | |
| ३) | श्री. विठोबा हरी हटकर,<br>मु.पो. कुंभारी ता. जत, जि.सांगली. | २२ | |
| ४) | श्री. नारायण धोंडीबा पडोळकर,<br>मु.पो.बागेवाडी ता. जत,जि.सांगली. | २३ | |

विरुध्द

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता, — विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ.

३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पुर्व उपविभाग, संख/जत.

**कोरमः-** १. श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

मी सदस्य सचिव श्री. एन.बी.बारसिंग, ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

मी, सदस्य सचिव कोल्हापूर आज दि.२४-११-२०१५ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच येथे खालील तक्रारींची सुनावणी झाली. अर्जदार ग्राहकातर्फे प्रतिनिधी म्हणून श्री. एच.डी.खापरे हे हजर होते. महावितरणतर्फे

श्री.ए.एम.मोडेकर, उपकार्यकारी अभियंता, संख

श्री.आर.आर.कुलकर्णी, सहायक अभियंता, जत

श्री.जी.व्ही.घमगुंडे, उपकार्यकारी अभियंता, कवठेमहांकाळ

हे हजर होते. ग्राहक गाऱ्हाणे केस क्र.२० ते २३ या सर्वच तक्रारी वेळेत वीज जोडणी न दिल्याबद्दल निर्माण झाल्या आहेत. एकाच विभागातील आहेत. ग्राहक प्रतिनिधी एकच आहे. सबब या चारही केसची सुनावणी एकत्रित घेवून निकालही एकत्रच देत आहोत. संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

१. **केस क्र.२० :** श्री महादेव चनगोंडा पाटील, रा.सनमडी, ता.जत, जि.सांगली

यांनी दि.०७.१०.२०१५ रोजी शेती पंप कनेक्शन न मिळाल्याने तक्रार अर्ज कोल्हापूर मंचाकडे अ फॉर्ममध्ये सादर केला. तो मंचाकडे दि.०९.१०.२०१५ रोजी प्राप्त झाला. श्री. पाटील यांनी गट क्र.६१ मधील शेत जमिनीत ३अ.श. शेती पंपासाठी पावती क्र.१५७६००६ दि.१३.०३.२०१५ रोजी रु.५१००/- भरलेले आहेत. वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने दि. १२.०६.२०१५ पर्यन्त त्यांना वीज पुरवठा मिळावयास हवा होता. परंतु तो त्यांना न मिळाल्याने त्यांनी दि. ०८.०७.२०१५ रोजी अंतर्गत कक्ष सांगली येथे अर्ज केला. कक्षाने जेष्ठता यादीप्रमाणे काम होईल अशा आशयाचा आदेश दिला. हा आदेश त्यांना मान्य नसल्यामुळे कोल्हापूर मंचाकडे अर्ज सादर केला आणि त्वरीत विद्युत पुरवठा अ ाणि विनिमयातील तरतुदीप्रमाणे भरपाईची मागणी केली आहे.

२. **केस क्र.२१ :** श्री बाळू दरेप्पा गडदे : मु.पो.बाज, ता.जत, जि.सांगली यांचा अ फॉर्ममधील दि. ०७.०१०. २०१५ शेती पंप कनेक्शन न मिळाल्यासंबंधी तक्रार अर्ज पोस्टाने या मंचाकडे दि. ०९.१०.२०१५ रोजी प्राप्त झाला. श्री गडदे यांनी गट क्र.४६७४ मध्ये ३ अ.श. शेती पंपासाठी रु.५१००/- पावती क्र. ६०९२२१३ नुसार दि.०६.०४.०२०१४ रोजी भरलेले आहे. वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने दि. ०५.०७.२०१५ पर्यन्त त्यांना विद्युत पुरवठा व्हावयास पाहिजे होता पण तो न झाल्यामुळे त्यांनी ०८.०७.२०१५ रोजी सांगली कक्षाकडे अर्ज केला पण त्यांनी वीज पुरवठयाचा आदेश न देता जेष्ठता यादीप्रमाणे काम होईल आणि यादीतील क्र.कळवावा अशा आशयाचा आदेश दिला हा आदेश मान्य न झाल्याने त्यांनी मंचाकडे अर्ज केला असून त्वरीत विद्युत पुरवठा व्हावा व विलंबाची भरपाई मिळावी असा अर्ज अ फॉर्ममध्ये सादर केला आहे.

३. **केस क्र.२२ :-** श्री विठोबा हरी हटकर, मु.पो.कुंभारी, ता.जत, जि.सांगली

यांचा तक्रार अर्ज शेती पंपासाठी कनेकशन न मिळाल्याबदलचा दि.०७.१०.२०१५ चा अर्ज या मंचाकडे दि.०९.१०.२०१५ रोजी प्राप्त झाला. श्री हटकर यांनी आपल्या गट क्र. ९९६ मध्ये ५ अ.श. शेती पंपासाठी रु.६१००/- पावती क्र.५४००४१० नुसार दि.२९.०९.२०१३ रोजी पैसे भरलेले आहे. वाहिनी विस्तार असल्याने हा वीज पुरवठा त्यांना दि.२८.१२.२०१३ पर्यत व्हावयास हवा होता पण त्यांना तो न झाल्यामुळे त्यांनी अंतर्गत कक्ष सांगली येथे दि.८.७.२०१५ रोजी तक्रार दाखल केली त्यांचा निकाल देताना सांगली कक्षाकडे जेष्ठता यादीप्रमाणे वीज पुरवठा करण्यात येईल व ग्राहकास यादीतील क्र.कळवावा अशा आशयाचा आदेश दिला. हा आदेश मान्य न झाल्यामुळे त्यांनी मंचाकडे अ फॉर्ममध्ये त्वरीत वीज पुरवठा मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे आणि विलंबाबद्दल भरपाईची मागणी केली आहे.

४. **केस क्र.२३ :-** श्री नारायण धोंडीबा पडोळकर, मु.पो.बागेवाडी ता.जत, जि.सांगली यांनी घरगुती वीज कनेक्शन न मिळण्याबदल दिलेला अ फॉर्ममध्ये दि.०७.१०.२०१५ चा अर्ज या कार्यालयाकडे दि.९.१०.२०१५ रोजी मिळाला. श्री पडोळकर यांनी आपले घर क्र.२२२ मध्ये घरगुती वीज कनेक्शन मिळण्यासाठी रु.५३२/- पावती क्र.८७६६४९८ नुसार दि.१७.१०.२०११ रोजी पैसे भरलेले आहेत. विद्युत वाहिंन्याचा विस्तार असल्याने हा पुरवठा दि.१६.०१.२०१२ पर्यत त्यांना मिळावयास हवा होता त्यांनी अंतर्गत कक्ष सांगली येथे दि. ०६.०८.२०१५ रोजी तक्रार दाखल केली आहे. सांगली कक्षाने तक्रारीचा निकाल देताना जेष्ठता यादीप्रमाणे विज पुरवठा करण्यात येईल अशा तऱ्हेचा आदेश दिलेला आहे. हा आदेश मान्य नसल्याने त्यांनी मंचाकडे अर्ज केला असून त्यांनी त्वरीत वीज पुरवठा करण्यात यावा आणि विलंबाची भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

मा.ग्राहक प्रतिनिधी यांनी आपली बाजू मांडताना सर्व कायदेशिर बाजू आयोगाची भूमिका, विनिमयातील तरतूदी आणि वस्तुंस्थिती यांची सविस्तर चर्चा करुन ग्राहकास त्वरीत वीज पुरवठा व्हावा असे आदेश देण्यात यावे तसेच विलंब भरपाईची मागणी केली आणि सदर मागणी कोणत्या सक्षम अधिकाऱ्याकडे करावी याची ग्राहकास माहिती मिळावी असे निवेदन केले.

## <u>विरुध्द पक्षाची भूमिका</u>

विरुध्द पक्षातर्फे महावितरण अधिकाऱ्यांनी आपली बाजू मांडताना कक्षाच्या निकालाचा आधार घेवून जेष्ठता यादीप्रमाणे कनेक्शन देण्यात येईल व सध्या इन्फ्रा २ या योजनेअंतर्गत कनेक्शन देण्याचे काम सुरु आहे. ग्राहकाला विनियम २००५ चे कलम ४.४ प्रमाणे अधिनियम किवा त्याखाली करण्यात आलेले नियम आणि विनियमकिंवा त्यवेळी अस्तित्वात असणाऱ्या कायद्यात अन्य तरतूदी नसल्यास वितरण परवानाधारक जेथवर शक्य असेल तेथवर विज दराच्या प्रत्येक वर्गवारीत प्रथम आलेल्यास प्रथम या तत्वावर विज पुरवठा करेल असे लेखी पत्रही दिलेले आहे. आणि प्रत्येकाच्या यादीतील क्रमांकही सादर केलेला आहे. विरुध्द पक्षाने आपली भूमिका स्पष्ट करताना दिलेल्या विवेचनावर ग्राहक प्रतिनिधींनी जोरदार आक्षेप घेवून कलम ४.४ चा चुकीचा अर्थ लावला जात आहे असे सांगितले. ग्राहकाची मागणी योग्य असून जर समाधानकारक कालावधीमध्ये विज देण्याची हमी मिळाल्यास ग्राहक भरपाईची मागणी मागे घेण्याचा निर्णय लिखीत स्वरुपात देण्याची आमची इच्छा आहे असे पत्र मा.अध्यक्ष यांना सादर केले आणि तोंडीही ही बाब मंचासमोर स्पष्ट मांडली.

### <u>वरील चर्चेनंतर खालील मुदे उपस्थित होतात</u>.

१. ग्राहकांना त्वरीत वीज पुरवठा करता येईल का१

उत्तर - होय.

२. भरपाईची मागणीचा निर्णय देता येईल का१

उत्तर - विनियमातील तरतूद आणि ग्राहकाच्या मागणीप्रमाणे.

३. आदेश

उत्तर अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारण मिमांसा

सर्व ग्राहक शेती व्यवसायाशी निगडीत ग्रामिण भागातील आहेत. घरगुती कनेक्शनसह सर्वानाच विनिमयातील तरतुदीप्रमाणे यापूर्वीच वीज पुरवठा होणे आवश्यक होते परंतु अदयाप झालेला नाही ही

वस्तुस्थिती आहे तरी आणखी विलंब न करता महावितरणने या अर्जदार ग्राहकांना आपल्या सक्षम यंत्रंणेचा वापर करुन दि. १५ फेब्रुवारी २०१६ पूर्वी विजेची जोडणी देण्याची व्यवस्था करावी. ग्राहकाची मागणी नुसार त्वरीत वीज पुरवठा जोडणी देणे उचित आहे असे मंचाचे मत आहे.

सदर निकालपत्रात हा मंच ठराविक कालावधीत विज पुरवठाकरायचा आदेश देत आहे. सबब ग्राहकाच्या वतीने ग्राहक प्रतिनिधींनी दिलेल्या लेखी विनंती अर्ज प्रमाणे आणि तोंडी निवेदनाप्रमाणे भरपाईचा मुददा शिल्लक राहत नाही असे मंचास वाटते.

विलंबाबाबत भरपाईचा अर्ज कोणत्या कार्यालयास सादर करावा याची माहिती सक्षम अधिकाऱ्यांनी ग्राहकांना दयावी अशी ग्राहकाची मागणी आहे. मंच ती मान्य करत आहे.या माहितीमुळे केवळ याच नव्हे तर सर्वच ग्राहकांची सोय होणार आहे.

## आदेश

१. विज जोडणीची ग्राहकाची मागणी मान्य करण्यात येत आहेय.
२. भरपाईचा आदेश नाही.
३. विलंब भरपाई अर्जासाठी सक्षम अधिकारी नेमस्त करावा.
३. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
४. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : २-१२-२०१५

(एन. बी.बारसिंग)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

श्री. पी. एस. बुरांडे,
ग्राहक सदस्य,

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.